भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-२७/०३/२०१९

# प्रेसनोट

## न-हे सरपंचाच्या पतीच्या खुनप्रकरणी माजी सरपंचास अटक

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक-१३/०३/२०१९ रोजी पहाटे ०५.३० वा.सुमारास ओमकार लॉजचे अलीकडे, आंबेगाव खु सर्व्हिस रोड, मुबंई बंगलोर हायवे लगत, इसमनामे बाळासाहेब सोपान वनशिव वय-५२ वर्षे रा.सदर व त्यांचा मित्र प्रकाश बाबुराव टिळेकर रा.सदर हे पायी फिरण्यासाठी गेले असता, पांढरे रंगाची पोलो कारसारखी कार, हि आंबेगाव खु सर्व्हिसरोडन दोन ते तीन वेळा संशयितरित्या फिरुन, बाळासाहेब वनशिव व त्यांचे मित्र प्रकाश टिळेकर हे व्यायाम करुन सर्व्हिस रोडच्या कडेने कठड्यालगत डावे बाजुने पायी घराकडे येत असताना पोलो कारचालकाने पाठीमागून जोरात येवून बाळासाहेब वनशिव यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने जोरात धडक देवून गंभीर जखमी केले होते त्यानंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला .त्याबाबत भारती विद्यापिठ पोलीस ठाणे गु.रजि.नं-२२६/२०१९ भा.द.वि कलम ३०२,१२०(ब) प्रमाणे गुन्हात कलमवाढ झाली आहे.

दिनांक-२६/०३/२०१९ रोजी सदर गुन्हयाचे अनुषंघाने गुन्हयातील आरोपीचा पो.उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे स्टाफसह शोध घेत असताना **पोलीस कर्मचारी उज्वल मोकाशी व शिवा गायकवाड** यांना त्यांचे माहीती मिळाली की, वरील दाखल गुन्हयातील पाहीजे व निष्पन्न आरोपी भुषण रानवडे रा.न-हे गाव हा नेरूळ नवी मुंबई येथे फीरत आहे.अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने पो.उप-निरीक्षक महेंद्र पाटील यांचे तपास पथकाने नेरूळ नवी मुंबई येथे पकडुन अधिक चौकशी करून नाव पत्ता १) भुषण रोहीदास रानवडे वय.३० वर्ष रा. भैरवनाथ मंदीरामागे न-हेगाव पुणे असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे दाखल गुन्हयाबाबत विचारपूस करता त्यांने त्याचे मित्रनामे १) अविनाश कैलास कांबळे वय-३९वर्ष रा.विठ्ठल कलावती निवास जिल्हा परिषद शाळेशेजारी न-हे गाव ता.हवेली जि.पुणे २) नितीश सतिष थोपटे वय-३० वर्ष राथोपटे बिल्डींग अंबाईमाता मदीर धायरी गाव पुणे ३) संदिप संतोष पाटील वय-३१ वर्ष रा-श्री ढोरे यांचे घरी भाड्याने परी हाइटस गंधर्व हॉटेलच्या पाठीमागे माळवाडी पुणे. यांचे मदतीने त्याचा मित्रनामे रोहीत पवार रा.न-हे गाव याची पोलो गाडी वापरून गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, दाखल गुन्हया करण्याचे कारण व सखोल तपास करणेकामी त्यास अटक करण्यात आलेली आहे.तसेच भुषण रानवडे याचा ड्राइव्हरनामे ४) प्रशांत ऊर्फ बाबा रमेश पुजारी वय.३० वर्ष रा.राजाभाऊ वाडेकर चाळ रुम नं १, जुन्या विठठल रुक्मिणी मंदीरासमोर न-हेगाव पुणे यास देख्ील कटात सहभाग असल्याने दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली असून आत्तापर्यंत एकुण पाच आरोपींना अटक करण्यात आलेली असून इतर आरोपींचा शोध चालु आहे.

आरोपींनी अपघाताचा बनाव करून जीवे ठार केलेचा गुन्हा भारती विद्यापिठ पोलीस ठाणेकडील तपास पथकाने उघडकीस आणलेला आहे. अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी महेंद्र पाटील हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.व्ही.पी.नांदेडकर सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे .,स.पो.निरी नलवडे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक महेंद्र पाटील ,सहा.पो.उप-निरीक्षक प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,श्रीधर पाटील,गणेश सुतार,समीर बागशिराज,उज्वल मोकाशी,शिवदत्त गायकवाड,जगदीश ख्ेडेकर यांचे पथकाने केलेली आहे.**